महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

# कृषी विद्यान संकुल, काष्टी

**KVS NEWS**

## कृषी विज्ञान संकुल काष्टी मालेगाव येथे आंतरराष्ट्रीय श्रीअन्न (मिलेट्स ) सम्मेलन कार्यक्रम साजरा

---

दि.१८ मार्च २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता आंतराष्ट्रीय श्रीअन्न (मिलेट्स ) सम्मेलन , या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतीय कृषि अनुसंधान परिषद ,नवी दिल्ली येथे करण्यात आले. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत कृषि विज्ञान संकुल काष्टी, मालेगाव येथे करण्यात आले. यावेळी कृषी विज्ञान संकुल काष्टी मालेगाव यांचे प्रमुख व सहयोगी अधिष्ठाता कृषी महाविद्यालय डॉ. सोमनाथ सोनवणे तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संजय पाटील उपस्थित होते. डॉ. सोनवणे यांनी उपस्थित प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी श्रीअन्न ( मिलेट्स) चे आपल्या आहारातील महत्त्व समजावून सांगितलं.

यावेळी कृषी विज्ञान संकुल अंतर्गत कृषी महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि कृषी तंत्रनिकेतन या सहाही महाविद्यालयाचे अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
# कृषी विद्यान संकुल, काष्टी

## KVS NEWS

